# महाराष्ट्र शासन

(६७) (३९७)

क्रमांक : एलसीएस २६९५/१७५८/प्र.क्र. ६३३८/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- 10 JUL 2001

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

JUL 2001
12640
II-B

(३५०)

**विषय :-** जमीन मुंबई - उपनगर जिल्हा
मौजे चेंबूर, स.क्र. ३५६, भूखंड क्रमांक १
जय शशांक को.ऑप. हाऊसिंग सोसायटी
यांना मंजूर केलेल्या जमिनीबाबत.

**संदर्भ :-** आपले क्रमांक सी/कार्यासन-२ बी/३३/अे-५५६
दिनांक १२-२-२००१ चे पत्र

२. जय शशांक सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेस पीडब्ल्यूआर २१९ या योजनेअंतर्गत मौजे चेंबूर येथील स.क्र. ३५६ च्या मंजूर अभिन्यासातील भूखंड क्रमांक १ मधील १५९३.६० चौ.मी. जमीन अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडील पत्र क्र. सी/डेस्क दोन/एलएनडी १ बी/सीआर ११४१ दिनांक ६-६-१९८५ अन्वये नेहमीच्या अटी / शर्तीवर मंजूर करण्यात आली आहे. संस्थेकडून मंजूर आदेशातील अटी / शर्तीचा भंग झाल्यामुळे संस्थेस मंजूर जमिनीवर नियोजित इमारतीचे बांधकाम करण्यास मुदतवाढ देण्यात आल्या संबंधीचे समक्रमांकाचे दिनांक १७-१०-१९९६ व दिनांक ४-७-१९९७ चे शुध्दीपत्रक समक्रमांकाच्या दिनांक १३-१०-१९९७ च्या आदेशान्वये रदबातल करण्यात येऊन मंजूर जमीन विहित कार्यपध्दतीचे अवलोकन करुन सरकार जमा करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना समक्रमांकाच्या दिनांक ८-७-१९९७ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. शासनाच्या वरील सुचनेप्रमाणे संस्थेकडील जमीन सरकार जमा करण्यासंबंधीच्या आपल्या दिनांक २२-३-२००० च्या आदेशाविरुध्द संस्थेनी विभागीय आयुक्तांकडे दाखल केलेल्या अपील अर्जावरील अपर आयुक्ताने त्यांच्या क्रमांक अपील / डेस्क/एलएनए-९७-२००० दि. २९-११-२००० अन्वये दिलेले आदेश विचारात घेता संस्थेस मंजूर जमीन सरकार जमा करण्याबाबत समक्रमांकाचे दिनांक ८-७-९७ आणि दि. १३-१०-९७ चे आणि त्या आदेशास अनुसरुन वेळोवेळी आपल्या कार्यालयाकडून पारित केलेले आदेश रद्द करण्यात येत आहेत व संस्थेस जमीन मंजूरीचे व नियोजित इमारतीचे बांधकाम करण्यास मुदत वाढीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश कायम करण्यात येत आहेत.

२०/७/०१

(विजय पाचकवडे)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत रवाना :- आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांजकडे त्यांच्या क्रमांक अपील / डेस्क/एलएनए-९७-२००० दिनांक २९-११-२००० च्या आदेशास अनुसरुन माहितीसाठी रवाना.



Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

क्रमांक सी/कार्यासन-२बी/३३/ओ-५५६
दिनांक : १६/ ०७/२००१

प्रति,

सचिव,
जयशशांक सह.गृह.संस्था (म)
व्दारा श्री.अेन.जी. मेस्त्री,
७५/३४० बेलासेडर रोड, माझगांव
मुंबई - ४०० ०१०

विषय:- जमीन:मुंबई उपनगर जिल्हा
गोजे-चेंबूर स.नं.३५६, भूखंड क्र.१
जयशशांक सह. गृह. संस्था (म) यांना मंजूर केलेल्या
जमिनीबाबत

आपल्या वरील विषयाच्या शासनास अग्रेषित केलेल्या दि. २९/३/२००० च्या पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येत आहे की, शासनाने शासन महसूल व वनविभाग पत्र क्रमांक एलसीएस्-२६९५/१७५८/प्र.क्र.६३३८/ज-३ दि. १०/७/२००१ अन्वये संस्थेस मंजूर जमिन सरकार जमा करण्याबाबत शासन समक्रमांकाचे दि. ८/७/९७ आणि १३/१०/९७ चे आणि त्या आदेशास अनुसरुन वेळोवेळी या कार्यालयाकडून पारीत केलेले आदेश रद्द करण्यांत आले आहेत. व संस्थेस जमीन मंजूरीचे व नियोजित इमारतीचे बांधकाम करण्यास मुदतवाढीबाबत वेळोवेळी केलेले आदेश कायम करण्यात येत आहेत. म्हणजेच शासनाच्या ह्या निदेशामुळे शासन ज्ञापन दि. १७/१०/१९९६ पुर्नजिवीत होत आहेत. सबब आपण खालील बाबींची पूर्तता तात्काळ करावी म्हणजे प्रकरणी पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल.

१) प्रस्तुत भूखंडाची दि. १/२/१९७६ रोजीची तात्पुरती किंमत र.रु. ४००/- प्रती चौ.मी. ग्राह्य धरुन संस्थेकडून येणे असलेली र.रु. ६,३७,४४०/- (अक्षरी र.रु. सहा लाख सदोतीस हजार चारशे चाळीस मात्र) अदा करावी.

२) प्रस्तुत जमिनीचे अंतिम मुल्यांकन सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडून तात्काळ करुन घेण्यांत येत आहे. तरी तात्पुरती निश्चित केलेली रक्कम व अंतिम येणारी किंमत यातील फरकाची रक्कम प्रचलीत दराने व्याज आकारुन संस्थेकडून वसूल करण्यांत येईल या मान्यतेबाबत र.रु.२०/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर लेखी हमीपत्र सादर करावे.

३) प्रस्तुत संस्थेतील सर्व सभासदांची सविस्तर चौकशी स्वतंत्रपणे करणे असल्याने संस्थेच्या सभासदांची माहिती सोबतच्या नमुन्यांत सादर करावी.

४) संस्थेस बांधकाम पूर्ण करण्यांस दि. २५/१०/९५ पासून पुढे दोन वर्षे मुदतवाढ देणे कामी र.रु. ७४९०/- (अक्षरी र.रु. सात हजार चारशे नव्वद मात्र) या कार्यालयास अदा करावी.

17/7/2001

व्यक्तिशः · जिल्हाधिकारी
यांची सही आहे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता

C:\2b\a556.doc

Scanned by CamScanner

क्रमांक: स्वतं/सत-२६२५/१०५८/प्र.क्र.६३२८/अ३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: १७.१०.१९९६

विषय:- <u>जमीन : मुंबई उपनगर जिल्हा</u>
मौजे चेंबूर स.क्र. ३४६ पैकी
आमन्यातकुर्लेस भू.क्र.१
जय शारदा सहकारी गृहनिर्माण
संस्थेस मंजूर केलेल्या जमिनीवर
बांधकामास मुदतवाढ देण्याबाबत-

<u>ज्ञापन:-</u>

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या वरील विषयावरील क्रमांक सी/कार्या-२बी/३३/जे-५५६, दिनांक १२.१२.१९९५ चे पत्रास अनुसरुन त्यांना विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्याचा मला निदेश आहे की, शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्रमांक २६७७/२४३०३/प्र.क्र.६५७/म४, दिनांक २७.७.१९८३ अन्वये मौजे चेंबूर, येथील स.क्र. ३४६ पैकी आमन्यातातील भूखंड क्र.१ मधील १५२३.६० चौ.मी. जमीन जय शारदा सहकारी गृहनिर्माण संस्थेस राष्ट्रकुमार-२१२, या योजनेंतर्गत विनामूल्य मंजूर करण्यात आली. प्रस्तुत जमिनीवरील अतिक्रमण दूर करुन संस्थेस जमिनीचा ताबा दिनांक २५.१०.१९९१ रोजी देण्यात आला आहे. संस्थेस मंजूर केलेल्या जमिनीपैकी १/३ क्षेत्र हे मनोरंजनार्थ मैदानासाठी आरक्षित आहे. संस्थेने ताबा घेतल्यापासून विहित दोन वर्षांच्या आत बांधकाम पूर्ण करणे आवश्यक होते. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांनी दिलेल्या दोन वर्षांच्या वाढीव मुदतीतही संस्थेने बांधकाम पूर्ण केलेले नाही. तसेच मुदत दिनांक २५.१०.१९९५ रोजी संपली आहे. संस्थेने आता बांधकाम पूर्ण करण्यासाठी आणखी मुदतवाढ मिळणेचे तसेच संस्थेस आयुक्त कार्यालयाकडून त्यांच्या जागा तारणावर कर्ज मिळण्यास परवानगी देण्यासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" मिळणेबाबत केलेली विनंती शासनाच्या विचाराधीन होती. संस्थेच्या बांधकाम आराखड्यास महानगरपालिकेने मंजुरी दिली असून बांधकाम सुरु करण्यास परवानगी देखील संस्थेस मिळाली आहे. ही बाब लक्षात घेऊन <u>एक विशेष बाब म्हणून</u> संस्थेस बांधकाम पूर्ण करण्यास दिनांक २५.१०.९५ पासून पुढे दोन वर्षे मुदतवाढ देण्यात शासन खालील अटीवर मंजुरी देत आहे:-

अ) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एलएनडी-४८५७/१६२१४६/ज-१, दिनांक २२.११.१९५७ मधील सार.क्र.२ मुद्दा क्र.(२) [illegible], मधील तरतुदीनुसार जमीन मंजुरीच्या दिनांकास असलेल्या अकृषिक दराच्या दोन टक्के इतके आधमूल्य आकारण्यात यावे.

.....२/-

४) संस्थेने वाढीव मुदतीत बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नाही हे स्पष्ट करण्यात येते.

उपरोक्त सहकारी गृहनिर्माण संस्थेस एम.डी.एस.सी. किंवा तत्सम वित्तीय संस्थेकडून कर्ज मिळण्यासाठी शासन परिपत्रक, समाज कल्याण सांस्कृतिक कार्य क्रिडा व पर्यटन विभाग क्र. मासोस–१९८७/१६२१७/[illegible] मावक–२, दिनांक ८.८.१९८९ मधील शासन निर्णयानुसार विभागाच्या समाज कल्याण अधिकारी यांचेकडून ना हरकत पत्र /जिल्हाधिकारी यांना आवश्यक वाटल्यास/ मिळण्यास/आल्यास अशावेळी शासन अशी परवानगी देत आहे:-

१) प्रस्तुत भूखंडाची दि. १.२.७६ रोजीची तात्पुरती किंमत संस्थेकडून वसूल करावी.

२) प्रस्तुत जमिनीचे अंतीम मुल्यांकन सहायक संचालक नगर रचना यांचेकडून तत्काळ करून घ्यावे व तात्पुरती निश्चित केलेली रक्कम व अंतिम येणारी किंमत यातील फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याज आकारून संस्थेकडून वसूल करावी.

३) प्रस्तुत संस्थेतील सर्व सभासदांची सविस्तर चौकशी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी स्वतंत्रपणे करावी व आवश्यक तर प्रस्ताव शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(स. कु. नरदे)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
पी. एम. आर. डी. ओ. इमारत,
वान्द्रे (पू) मुंबई–४०००५१

प्रतिलिपी:-
१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
३) सहायक संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण, मुंबई.
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६) समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
७) कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग (निवडनस्ती करिता), मंत्रालय मुं.